कोकणसाद
www.kokansad.com
रविवार, दि. १५ जानेवारी २०२३

# घरी कोणीतरी आपली वाट पाहतेय, हे सदैव डोक्यात ठेवा

## हळबे कॉलेजच्या युवाईला रस्ता अपघात टाळण्यासाठी वाहन निरीक्षक जितेंद्र पाटील यांनी दिला कानमंत्र

**कोकणसाद वृत्तसेवा**





**दोडामार्ग येथे हळबे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आरटीओ जितेंद्र पाटील. सोबत प्रा. डॉ. सुभाष सावंत,अनिल पावसकर व अन्य.**

**दोडामार्ग:** वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन केल्यास आपल्याबरोबरच इतरांचेही जीवन सुरक्षित राहील, यासाठी रस्त्यावर पायी चालताना, वाहन चालवताना सर्वांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. पण मित्रांनो 'आपली घरी कोणीतरी वाट पाहतोय' हे सदैव आपल्या डोक्यात फिट करा, नियम पाळा आणि सुरक्षित रस्ते प्रवास करा, असा कानमंत्र वाहन निरीक्षक जितेंद्र पाटील यांनी हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिला.

हळबे महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते. ११ ते १७ जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात ३३ व्या रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्गमार्फत राबविला जात आहे. याअंतर्गत येथील हळबे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सामाजिक कार्यकर्ते उदय पास्ते, प्रा. डॉ. संजय खडपकर, प्रा. प्रज्ञाकुमार गाथाडे, अनिल मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे मालक अनिल पावसकर, प्रकाश गवस आदी उपस्थित होते. श्री. पाटील पुढे म्हणाले की, कॉलेज वयात आपल्याला अनेक स्टंट करणे, धूम स्टाईलने गाड्या चालवणे, आपल्याकडे कोणीतरी पहावे म्हणून वेगवेगळे स्टंट करत बेदरकारपणे गाडी चालवणे, असे प्रकार सहाजिकच घडत असतात, पण मित्रांनो 'आपली घरी कोणीतरी वाट पाहतोय' हे सदैव आपल्या डोक्यात फिट करा, नियम पाळा आणि सुरक्षित रस्ते प्रवास करा, असा कानमंत्र त्यांनी कॉलेज युवाईला दिला. वेगमर्यादेचे पालन का करावे, दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे, रस्त्यावर लावण्यात आलेली वेगवेगळी चिन्हे या आदींबाबत सविस्तर माहिती पाटील यांनी दिली. वाहन नियमांचे पालन करावे व सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन पाटील यांनी करीत सर्वांनी इतरांनाही याबाबत जनजागृती करावी, असेही स्पष्ट केले.